सूचना का अधिकार

महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
(CIN.U40109MH2005SGC1536460)

मा.कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.पा. कंपनी मर्या तालुका - करवीर, जिल्हा - कोल्हापूर.
पिन कोड- ४१६ ००५.
संपर्क क. मो.७७६८९४०१११ (कार्या)-०२३१ -२६५१५२९
E mail :ee3210@mahatransco.in
Website: www.mahatransco.in

महापारेषण/का.अ./अउदा/ संवसु/वि/कोल्हापूर/मासं/ No 1133 दि 29 OCT 2021

# जाहीर नोटीस

महापारेषण अउदा संवसु विभाग, कोल्हापुर अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाऊ उमेदवार म्हणून सन २०२१-२०२२ करीता वीजतंत्री (Electrician) या ट्रेडमध्ये भरती प्रकिया राबविण्यात येत आहे. सदर शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या **www.apprenticeshipindia.gov.in** या संकेतस्थळावर अउदा संवसु विभाग, कोल्हापुर च्या खालील आस्थापना रजिस्ट्रेशन कमांकावर ऑनलाईन अर्ज सादर करणे गरजेचे आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि.२१.११.२०२१ (२३.५९) पर्यंत राहिल. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. वीजतंत्री (Electrician) शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा अधिनियमानुसार १ वर्षाचा राहिल. ऑनलाईन अर्जासाठी आवश्यक माहिती खालील अस्थापनेच्या नावे नोंदणी कमांकावर करणेत यावी.

| अस्थापनेचा रजिस्ट्रेशन कमांक | ट्रेड | एकुण |
|---|---|---|
| **Location : EHV O&M DIVISION, KOLHAPUR E05202702164** | वीजतंत्री (Electrician) | एकुण जागा- ३४ |

शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सोबत :- परिशिष्ट अ

(अभिजीत चं.धमाले)
कार्यकारी अभियंता
अ.उ.दा.सं. व सु. विभाग, कोल्हापुर

१) शैक्षणिक अर्हता– महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री या व्यवसाय परीक्षेत उत्तीर्ण असणे
आवश्यक आहे.

२) विद्यावेतन शासनाच्या नियमाप्रमाणे लागु राहिल.

३) पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले व सर्व निर्णय घेण्याचाा अधिकार व्यवस्थापनाकडे राखीव असतील व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनास बंधनकारक राहणार नाही. भरती प्रक्रीयेचे ठिकाण अउदा संवसु विभाग कोल्हापुर.
४) शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी आरक्षण शासनाच्या विविध नियमानुसार लागु राहिल.

सूचना का अधिकार

महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

(CIN.U40109MH2005SGC1536460)


मा.कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,<br>
म.रा.वि.पा. कंपनी मर्या तालुका - करवीर, जिल्हा - कोल्हापूर.<br>
पिन कोड- ४१६ ००५.<br>
संपर्क क. मो. (कार्या)-०२३१ -२६५१५२९<br>
**E mail :ee3210@mahatransco.in**<br>
**Website: www.mahatransco.in**


महापारेषण/का.अ./अउदा/ संवसु/वि/कोल्हापूर/मासं/ दि

## परीशिष्ठ-अ

| | | |
|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नांव व पत्ता | महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादित, अ.उ.दा. सं.व.सु. विभाग , कोल्हापुर |
| २. | मागणी करणारे अधिकारी यांचे पदनाम | कार्यकारी अभियंता |
| ३. | अर्जदाराने कोणत्या अधिका-याला भेटावे त्यांचे पदनाम | उप व्यवस्थापक (मासं) |
| ४. | निवड पध्दत | गुणवत्तेनुसार |
| ५. | क) भरावयाच्या पदाचे नांव व संख्या | वीजतंत्री पदसंख्या: ३४ |
| | ख)शिकाउ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी | वीजतंत्री पदसंख्या: १ वर्ष |
| | ग) विदयावेतन | शासकीय धोरणानुसार |
| ६. | शैक्षणिक अर्हता<br>वीजतंत्री | इ.१० वी उत्तीर्ण व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT ) नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यताप्राप्त शासनमान्य औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमधून आय.टी.आय वीजतंत्री परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| ७. | राखीव पदे | राज्यांच्या आरक्षण धोरणानुसार |
| ८. | भरती प्रकिया खालीलप्रमाणे राबविणेत येईल. | १)जे उमेदवार **www.apprenticeshipindia.gov.in** या संकेतस्थळावर अर्ज करतील त्यांचेच अर्ज विचारात घेतले जातील. (**EHV O&M DIVISION KOLHAPUR**)<br><br>२) आय.टी.आय.उत्तीर्ण गुण व एस.एस.सी.उत्तीर्ण गुण यांना प्रत्येकी (आय.टी.आय. व एस.एस.सी.) यांचे ५० टक्के वेटेज घेवून गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.<br><br>३) राज्य शासनाच्या विहीत तरतुदीनुसार आरक्षणनुसार निवड यादी तयार केली जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | | ४) निवड झालेल्या पात्र उमेदवारांना विभागीय स्तरावरून बोलवून कागदपत्रांची पडताळणी केली जाईल.<br><br>५) निवड केलेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सालय यांच्याकडून वैदयकिय चाचणी करून घेणे बंधनकारक राहील.<br>६) कॉन्ट्रॅक्ट रजिस्टर शिवाय कोणताही उमेदवार शिकाऊ उमेदवार होण्यास पात्र ठरणार नाही. |
| ९. | वयोमर्यादा | किमान १८ वर्षे पूर्ण |
| १०. | शिकाउ उमेदवार पदे भरवयाची अंतिम तारीख | दि.२१.११.२०२१ (२३:५९) पर्यतचे अर्ज |
| ११. | उमेदवार यांनी घ्यावयाची काळजी बाबत | १) उमेदवाराने आपला प्रोफाईल तपासून घेणेची जबाबदारी उमेदवाराची असेल.<br><br>२) ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे याची पडताळणी करून माहिती भरावी.<br><br>३) एस.एस.सी.गुणपत्र/प्रमाणपत्र , शाळा सोडल्याचा दाखला व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्र/प्रमाणपत्र (चारही सेमिस्टरची) सांक्षाकित प्रत ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज केला असेल तर मागासवर्ग जात प्रमाणपत्र तसेच आर्थिक दुर्बल घटक **(EWS)** मधुन अर्ज केला तर **(EWS)** प्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक असेल.<br><br>४) शिकाऊ उमेदवारांची सही,पालकांची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी मार्क, आयटीआय मार्क, ही माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.<br><br>५) शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-याकडून दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.<br><br>६) शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन **(Online)** अर्ज करताना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्राची सुस्पष्ट स्कॅन करून योग्य रितीने ऑनलाईन **(Online)** अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| | | ७) प्रत्येक उमेदवाराची वर्तणुक चांगली व शिस्तप्रिय असणे आवश्यक आहे याबाबत कोणतीही गैरवर्तणूक केल्यास शिकाऊ कायदा १९६१ मधील १७ अन्वये शिक्षेस ते पात्र ठरतील.<br><br>८) प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर ३०० मार्कची (६ तास अवधीची) परिक्षा उमेदवाराने देणे अनिवार्य राहील.<br><br>९) जो उमेदवार प्रशिक्षण कालावधी पूर्ण करेल तोच उमेदवार परीक्षेस बसण्यास पात्र असेल. |
| १२. | इतर संबंधित माहिती | सदर शिकाऊ भरतीमध्ये अंशत: बदल किंवा संपूर्ण रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखुन ठेवत आहे. सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही. तसेच सदर बाबतीत कुठल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |

(अभिजीत चं.धमाले)
कार्यकारी अभियंता
अ.उ.दा. सं.वसु.विभाग, कोल्हापुर